ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५


# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र


प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५९२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5484. Licence No. 53

वर्ष ३१ | पुणे, बुधवार १७ नोव्हेंबर, १९६५ | अंक ११





**जगातील सर्वांत जलद आगगाडी**—जपानच्या नॅशनल रेल्वे कॉर्पोरेशनने जगातील सर्वांत वेगवान् गाडी चालू केली आहे. ही गाडी जपानमधील टोकिओ ते ओसाका ह्यांच्या दरम्यान प्रवास करील. ह्या दोन शहरांमधील अंतर ५१५ किलोमीटर असून ते तोडण्यास गाडीला ३ तास, १० मिनिटेच लागतील. गाड्या दर तासाला जास्तीत जास्त २१० किलोमीटर वेगाने धावू शकतात व त्या मुख्यत: उद्योगपतींना उपयोगी पडणाऱ्या आहेत. सर्व प्रकारच्या आधुनिक सोयींनी युक्त अशा त्या बनविण्यात आल्या आहेत. टोकिओ ते ओसाका ह्यांच्यामधील अंतर तोडण्याचा काळ नव्या गाड्यांमुळे ५० मिनिटांनी कमी झाला आहे.

**भात सडण्याच्या गिरणीची देणगी**—पूर्व जर्मन सरकारने भारत सरकारला भात सडण्याची एक गिरणी देणगीदाखल दिली आहे. गिरणीची किंमत १ लाख रुपये आहे. तिच्या साह्याने दर तासाला १ टन तांदुळाचे उत्पादन करता येईल. ओरिसातील संबळपूर जिल्ह्यात ती उभारण्यात येणार आहे. गिरणी भारताच्या प्रतिनिधीच्या हवाली करताना पूर्व जर्मनीचा प्रतिनिधी म्हणाला की दर तासाला २ टन ते ४ टन तांदुळाचे उत्पादन करू शकणाऱ्या अत्याधुनिक गिरण्या पूर्व जर्मनी भारताला पुरवू शकेल.

**औषधांच्या कारखान्यांच्या अडचणी**—पश्चिम बंगालमधील सुमारे १०० औषधे तयार करणाऱ्या कंपन्या बंद पडण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. ह्या कारखान्यांना कच्च्या मालाचा तुटवडा भासत आहे. जरूर तो कच्चा माल आयात करण्यासाठी राज्य सरकारने भारत सरकारकडे ९७ लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची मागणी केली आहे. गेल्या वर्षी ह्या मालासाठी २७ लाख रुपयांचे परदेशीय चलन मंजूर करण्यात आले होते.

**चहावरील जकात स्थगित**—युरोपिअन सामायिक बाजारपेठेच्या वरिष्ठांनी भारतामधून आयात होणाऱ्या चहावरील जकात २ वर्षांपुरती स्थगित केली होती. जकात स्थगित केल्याची मुदत ३१ डिसेंबर १९६५ रोजी संपत आहे. परंतु भारतामधून येणाऱ्या चहावरील जकात तात्पुरती रद्द करण्याचा निर्णय आणखी दोन वर्षांसाठी घेण्यात येण्याची शक्यता आहे. चहाप्रमाणेच काजूगरासारख्या काही मालालाही ही सवलत मिळण्याचा संभव आहे.

**गुजरातमधील रम्य ठिकाण**—अहमदाबादपासून ४० मैलांवर गुजरातमधील नात सरोवर हे रम्य ठिकाण आहे. ह्या सरोवराच्या आसपासच्या प्रदेशात पक्ष्यांना मारण्याची मनाई आहे. पक्ष्यांचा अभ्यास करणारे अनेक लोक ह्या स्थळास भेट देतात. सरोवराच्या परिसरात एक चांगले अतिथिगृह असून तेथून नौकाविहारही करता येतो. गुजरातमधील हौशी प्रवाशांचा हंगाम आता चालू झाला आहे.

**होय, समशेरखानच**—भारत–पाकिस्तान संघर्षात युद्धबंदी अमलात आल्यावर लाहोर आघाडीवर काही भारतीय लष्करी अधिकारी व पाक लष्करी अधिकारी ह्यांची काही कामासाठी एकत्र बैठक झाली. बैठकीत हिंदच्या बाजूने आघाडीवर लढणाऱ्या एका मुसलमान अधिकाऱ्याची ओळख समशेरखान म्हणून त्यांना करून देण्यात आली. पण पाकिस्तानच्या अधिकाऱ्यांचा ह्यावर विश्वासच बसेना. ते त्या अधिकाऱ्याला समशेरसिंग असेच संबोधू लागले.

**ऑस्ट्रेलिआची भारताला देणगी**—कोलंबो मदत योजनेप्रमाणे ऑस्ट्रेलिआकडून भारताला ४० लाख पौंड लोकर देणगी म्हणून मिळणार आहे. ही देणगी तीन वर्षांच्या अवधीत पुरी करण्यात येईल, लोकरीची किंमत सुमारे २ कोटी रुपये होईल आणि भारतातून निर्यात करण्यात येणाऱ्या लोकरीच्या कापडाच्या उत्पादनासाठी तिचा उपयोग करण्यात येईल. विक्रीच्या रकमेतून लोकरीचे संशोधन करण्यासाठी एक केंद्र उभारण्यात येणार आहे.

**भारताच्या वार्तापटांचे वितरण**—परदेशांतून भारताविषयी व त्याच्या धोरणाविषयी माहिती देण्यासाठी हिंदी वार्तापट व अनुबोधपट दाखविण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. हे काम करण्यासाठी भारताचे माहिती व नभोवाणी खाते अमेरिका, ब्रिटन, आफ्रिका आणि आग्नेय आशिया ह्या ठिकाणी मुद्दाम कचेऱ्या उघडणार आहे. भारतासंबंधी अधिकृत माहिती पुरविण्याचा उद्देश ह्यामागे आहे.

**चीनच्या मदतीने कारखाने**—पाकिस्तानने चीनच्या मदतीने अवजड यंत्रसामग्री तयार करण्याचा एक कारखाना काढण्याच्या योजनेचा विचार चालविला आहे. ह्या कारखान्याच्या साह्याने पाकिस्तानात साखर, सिमेंट, रेल्वेचा माल, पेट्रोलचे शुद्धीकरण करणारी साधने, यान्या, रस्ता करण्याचे रूळ, माती हलविण्याची यांत्रिक फावडी, इत्यादींच्या कारखान्यांची यंत्रसामग्री तयार होईल.


**बँक**

या शब्दाची व्युत्पत्ती बँको ( Banco ) या इटालियन शब्दापासून झाली आहे. बँको म्हणजे बसावयाचे बाक. प्राचीन काळी सावकारी करणारे लोक बाजारात बाकावर बसून व्यवहार करीत असत. आजकालच्या प्रचंड बँकांचा जन्म बाजारातील बाकापासून झाला हे ऐकून केवढे चमत्कारक वाटेल ! पण ते तितकंच खरं आहे.

तसंच अद्याप माहीत नसलेली तुमची किती कामं आम्ही करतो हे प्रत्यक्ष ऐकल्यानंतर पाहिल्यानंतर तुम्हालाही आश्चर्य वाटेल आणि " बँकिंग "ची सवय ठेवाल. त्यासाठी भेटा.

शेड्यूल्ड बँक ) **दि बेळगांव बँक लिमिटेड** ( स्थापना : १९३०

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव

म्हैसूर, महाराष्ट्र व गोव्यात मिळून एकूण ३८ शाखा

: मुंबई शाखा :

नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९

# अर्थ

बुधवार, १७ नोव्हेंबर, १९६५





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कंपनी कायद्यांतील दुरुस्त्या अमलात आल्या

### ऑडिटरच्या रिपोर्टांतील नव्या बाबी

१९६५ चा कंपनी कायदा दुरुस्तीचा कायदा १५ ऑक्टोबर, १९६५ रोजी अमलात आला; फक्त १३ वे व ४६ वे कलम केव्हा अमलात यावयाचे, ते मागाहून जाहीर केले जाईल.

#### "कॉस्ट ऑडिट"

उत्पादनाच्या किंवा खाण कामाच्या धंद्यातील कोणत्याही कंपनीस तिच्या हिशेबाच्या पुस्तकात, वापरलेला कच्चा माल, दिलेली मजुरी, इत्यादींचा तपशील देण्यास भाग पाडण्याचा सरकारला अधिकार आता मिळाला आहे. "कॉस्ट ऑडिट" करण्यास आवश्यक ते हिशेब त्यामुळे आपोआप तयार राहतील. ह्या कॉस्ट ऑडिटमुळे एकाच धंद्यातील वेगवेगळ्या कंपन्यांच्या व्यवहारांची तुलना करणे सोपे जाईल. त्यातून काही आडाखे बांधता येतील आणि त्यापेक्षा प्रत्यक्ष उत्पादनखर्च बराच जास्त आढळला तर संबंधित कंपनीकडून त्याचा खुलासा मागविता येईल. धंद्यातील नफ्याचे प्रमाण ओळखण्यासही ह्या कॉस्ट ऑडिट रिपोर्टांचा उपयोग होईल; त्यातून पुढे विक्रीची किंमत उतरविण्यास लावण्याचा प्रश्न महत्त्वाचा ठरण्याचा संभव आहे. अशा तऱ्हेने कॉस्ट ऑडिटचा उपयोग केला गेला, तर त्यामुळे कार्यक्षमतेला उत्तेजनच उरणार नाही, अशी उद्योगपतींची त्याबाबत प्रतिक्रिया आहे.

#### डायरेक्टरांचे तारतम्यावर ऑडिटर अभिप्राय देणार

तारणावर दिलेल्या कर्जांना तारण पुरेसे आहे किंवा नाही, त्या कर्जाच्या अटी कर्ज देणाऱ्या कंपनीच्या हितास पोषक आहेत किंवा नाहीत, इत्यादिसंबंधी आता स्टॅच्युटरी ऑडिटरने अहवाल सादर करावयाचा आहे. ह्याचा अर्थ, कंपनीच्या व्यवस्थापकांच्या तारतम्यावर ऑडिटरने आपले मत व्यक्त करावयाचे आहे. लंडन अँड जनरल बँकेबाबत एका महत्त्वाच्या निवाड्यात जज्जाने म्हटले होते की तारणावर किंवा विनातारण दिलेल्या कर्जातील अटींच्या युक्तायुक्ततेशी ऑडिटरचा संबंध पोचतच नाही. कंपनीचा व्यवहार शहाणपणाने चालविला जातो किंवा नाही, ती नफा मिळवते का नाही, ह्याचा ऑडिटरने विचार करावयाचे कारण नाही. शेअर होल्डराबाबत त्याचे कर्तव्य फक्त त्याने पार पाडावयाचे आहे. ह्या सुप्रसिद्ध निवाड्यातील ह्या तत्त्वाला कंपनी कायद्यातील दुरुस्तीने मुरड घातली आहे.

#### डायरेक्टरांचे वेतन, सभेची फी

डायरेक्टरांचे वैयक्तिक खर्च कंपनीच्या हिशेबात खर्ची टाकले आहेत काय, इन्व्हेस्टमेंट्सची विक्री करतांना तोटा आला आहे काय, रोखीने शेअर्स विकले असे दाखविले असल्यास प्रत्यक्ष रोख रकम जमा झाली आहे किंवा नाही, हे सर्व ऑडिटरने शोधून काढावयाचे आहे. त्याला कोणत्याही एखाद्या विशिष्ट बाबीपुरती चौकशी करून अहवाल सादर करायला लावण्याचा अधिकार सरकारला आहे.

कंपनीसाठी काम करणाऱ्या डायरेक्टरांबाबत सरकारने आता जरा सढळ धोरण स्वीकारले आहे. त्यांना कमिशनऐवजी मासिक पगार द्यायला हरकत नाही. (अर्थात, सरकारच्या मंजुरीने). कंपनीचे हिशेब आणि कागदपत्रं तपासण्याचा डायरेक्टरांना स्पष्ट अधिकार देण्यात आलेला आहे. डायरेक्टरांची एकूण संख्या १२ असू शकेल आणि त्यांची सभेची फी २५० रुपयांपर्यंत ठरविण्याला सरकारची मंजुरी आवश्यक नाही. डायरेक्टरांच्या वयोमर्यादेचे कलम रद्द करण्यात आले आहे.

१९५६ च्या कंपनी कायद्यातील काही तरतुदी अधिक घट्ट करण्यात आल्या आहेत. उदाहरणार्थ, डायरेक्टरांनी तांत्रिक व इतर सेवेसाठी वेगळे वेतन घ्यायला हरकत नाही, परंतु डायरेक्टरांच्या मेहेनतान्याला जी मर्यादा घातलेली आहे, ती अमलात आणतेवेळी ह्या वेतनाची त्यात गणना केली जाईल. व्यावसायिक कामगिरीला हा निर्बंध लागू नाही. आर. ए ठाणावाला वि०द्द ज्योति लि. ह्या दाव्यात न्यायमूर्ति छगला ह्यांनी प्रतिपादन केलेले तत्व (मेहेनतान्याच्या मर्यादेतून डायरेक्टरांच्या इतर कामगिरीबाबत वेतन वगळण्याची आवश्यकता) आता अमलात राहणार नाही.

#### डायरेक्टर बोर्डाबाहेरील सूत्रचालक

रजिस्ट्रार किंवा कोणताही त्याने नेमलेला अधिकारी कंपनीचे सर्व कागदपत्र कामाच्या वेळात पूर्वसूचना न देता तपासू शकेल, त्याची टिपणे घेऊ शकेल, त्यावर खुणा करून ठेवू शकेल. काही कंपन्यांतून डायरेक्टर हे केवळ बाहुले असतात; खरा कारभार चालविणारा बाहेरच असतो. अशा कंपनीच्या कारभाराची कायदेशीर जबाबदारी ह्या सूत्रधारावर टाकली जाईल, अशी आता तरतूद करण्यात आली आहे. ज्या ज्या व्यक्तीच्या सूचनेप्रमाणे बोर्ड निर्णय घेते, ती ती व्यक्ती "ऑफिसर" ह्या व्याख्येत समाविष्ट करून ही तरतूद साध्य करण्यात आली आहे. हिशेबाच्या वह्यांप्रमाणे व्हाउचर्स व इतर कागद आठ वर्षांपर्यंत राखण्यात आले पाहिजेत. एखाद्या कंपनीचे दुसऱ्या कंपनीत विलिनीकरण झाले, तर तिचे कागदपत्र मध्यवर्ती सरकारच्या परवानगीशिवाय नष्ट करता येणार नाहीत; पूर्वीचे काही गुन्हे असल्यास ते शोधून काढण्यासाठी तपासणीकरिता हे कागदपत्र उपलब्ध असावेत, हा त्याचा हेतू. व्हॉलंटरी लिक्विडेशनमध्ये गेलेल्या कंपनीच्या लिक्विडेटरने हिशेब तपासून त्याचा, भागीदारांच्या हितास बाधक असा कंपनीचा व्यवहार नसल्याबद्दल अहवाल सरकारला सादर गेल्याखेरीज ती कंपनी रद्द झाल्याचे समजण्यात येणार नाही.

#### निष्कारण जाचक कलमात सुधारणा

कंपनीच्या नोकरीत किंवा इतर आर्थिक नफ्याच्या जागी डायरेक्टराला, त्याच्या भागीदाराला किंवा नातेवाइकाला नेमावयाचे असल्यास कंपनीचा स्पेशल ठराव आधी करावा लागे. आता ह्यापुढे, अशा नेमणुकीस नंतरच्या साधारण सभेची मंजुरी घेतली तरी चालेल. रजिस्ट्रारकडे पाठवावयाचे काही किरकोळ तक्ते, तपशील ह्यांबाबत जाचक अटी सैल करण्यात आल्या आहेत.

## हिंदी बँकिंगचे उद्‌बोधक आकडे

(आकडे लक्ष रुपयांचे)

| | १९५१ | १९६१ | १९६२ | १९६३ | १९६४ |
|---|---|---|---|---|---|
| बँकांची संख्या | ५६६ | २९२ | २७६ | २५२ | १५६ |
| (अ) शेडयूल्ड | ९२ | ८२ | ८० | ७९ | ७६ |
| (ब) बिगर-शेडयूल्ड | ४७४ | २१० | १९६ | १७३ | ८० |
| भारतातील बँक कचेऱ्या | ४,१५१ | ५,०१२ | ५,१७३ | ५,४९१ | ५,८१८ |
| (अ) शेडयूल्ड | २,६४७ | ४,३९० | ४,६०८ | ५,००४ | ५,४९२ |
| (ब) बिगर-शेडयूल्ड | १,५०४ | ६२२ | ५६५ | ४८७ | ३२६ |
| प्रत्येक कचेरीमागील लोकसंख्या ('000) | ८७ | ८८ | ८७ | ८३ | ८० |
| एकुण ठेवी | ९०८,४७ | २०११,५२ | २,१८१,२५ | २,४२०,२९ | २,७३८,६३ |
| प्रत्येक कचेरीगणिक सरासरी ठेवी | २२ | ४० | ४२ | ४४ | ४७ |
| (अ) शेडयूल्ड बँका | ३२ | ४५ | ४७ | ४८ | ५० |
| (ब) बिगर-शेडयूल्ड बँका | ५ | ६ | ७ | ७ | ९ |
| दर माणशी ठेवी (रुपये) | २५ | ४६ | ४९ | ५३ | ५९ |
| येणें कर्ज | ६२६,९० | १,२९३,१७ | १,४४७,५० | १,६२२,१८ | १,८८०,३६ |
| (अ) शेडयूल्ड बँका | ५८१,३९ | १,२६८,१८ | १,४२६,४४ | १,६०४,४४ | १,८६५,२५ |
| (ब) बिगर-शेडयूल्ड बँका | ४५,५१ | २४,९९ | २१,०६ | १७,७४ | १५,११ |
| प्रत्यक कचेरीगणिक कर्ज | १५ | २६ | २८ | ३० | ३२ |
| (अ) शेडयूल्ड बँका | २२ | २९ | ३१ | ३२ | ३४ |
| (ब) बिगर-शेडयूल्ड बँका | ३ | ४ | ४ | ४ | ५ |
| दर माणशी कर्ज (रु.) | १७ | २९ | ३२ | ३६ | ४० |
| वसूल भांडवल व रिझर्व्ह | ७५,१५ | ७६,३६ | ८४,१४ | ८८,४६ | ९१,९७ |
| (अ) हिंदी शेडयूल्ड बँका | ६१,७८ | ७०,५६ | ७८,५५ | ८३,२५ | ८८,१७ |
| (ब) बिगर-शेडयूल्ड बँका | १३,३७ | ५,८० | ५,५९ | ५,५१ | ३,८० |
| वसूल भांडवल-रिझर्व्हचे ठेवीशी प्रमाण | ९.७ | ४.१ | ४.२ | ४.० | ३.७ |
| कर्जाचे ठेवीशी प्रमाण | ६९.२ | ५४.३ | ६६.५ | ६७.२ | ६८.८ |
| बँकेचे कर्मचारी | ... | १,१५,१०७ | १,२४,८४६ | १,२२,८२१ | १,४३,४६१ |
| एकूण उत्पन्न | ४५,३५ | १२४,०० | १४२,२१ | १६१,३३ | १८९,७१ |
| एकूण खर्च | ३२,३० | ९५,७३ | ११४,०७ | १३०,३३ | १५४,९२ |
| पगार खर्च | १५,४० | ३५,८३ | ४२,६४ | ४९,१३ | ५८,९५ |
| नफा (करापूर्वी) | १३,०५ | २८,२७ | २८,१४ | ३१,०० | ३४,७९ |
| करापूर्वी नफ्याचे वसूल भांडवल-रिझर्व्हशी प्रमाण | १२.२ | ३३.३ | २९.८ | ३०.१ | ३२.३ |


वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७११००

बचतीच्या आकर्षक योजना

(१) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर ३॥ टक्के
(२) त्रैवार्षिक मासिक बचत — " ३। "
(३) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटे — " ५

*मुदतीच्या आकर्षक दरांसंबंधी चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## वैकुंठराय मेहता

### कार्यक्षम सहकारी संस्था, हेच त्यांचे खरे स्मारक

वैकुंठराय मेहता इहलोक सोडून गेले त्याला दि. २८-१०-६५ रोजी एक वर्ष होऊन गेले. त्यांच्याशी ज्यांचा या ना त्या कारणांनी दाट, घनदाट संबंध आला त्यांना त्यांच्या गेल्या वर्षीच्या अकल्पित निधनाने आपल्या एखाद्या आप्तस्वकीयांच्या झालेल्या मृत्यूप्रमाणे दुःख झाले! त्यांच्या सेवावृत्तीची सरिता कालसागरांत विलीन झाली. आज सहकारी चळवळ आणि सहकारी संस्था यांचा उच्च स्वराने उद्घोष केला जात आहे. पण ६० वर्षांपूर्वी जेव्हा ही चळवळ आपल्या भारतात सुरू झाली, त्या वेळी या चळवळीकडे सुशिक्षित आणि इतर बहुसंख्य लोक उदासीनतेनेच काय पण उपेक्षेने पाहात होते. ही गोष्ट जाणत्यास अज्ञात नाही.

आपल्या भारतात ही चळवळ १९०४ साली सरकारच्या प्रेरणेने आणि पुरस्काराने सुरू झाली. त्या वर्षी सहकारी चळवळीबद्दल पहिला कायदा झाला. सरकारप्रणीत चळवळ म्हणून राष्ट्रीय चळवळीतील पुढारी तिजबद्दल आपुलकी बाळगीत-दाखवीत नव्हते. 'सहकार' हे काय तत्त्व आहे, त्यात कोणती सामर्थ्यबीजे आहेत याकडे विशेष असे लक्ष बुद्धिमंतांनी दिलेच नाही असे म्हटले तरी चालेल. आणि याचे कारण एकच; ते म्हणजे ती चळवळ 'सरकारी' होती हे होय. पण सहकार हे एक अमोघ अस्त्र आहे, एक महान मंत्र आहे हे मुंबईच्या दूरदर्शी उद्योगपतींपैकी सर विठ्ठलदास ठाकरसी आणि सर लल्लूभाई सामळदास यांनी अचूक हेरले आणि त्यांनी पूर्ण विचारांती या मंत्राची दीक्षा घेण्याचे ठरविले. या दोघांच्या प्रयत्नांनीच १९११ या वर्षी सहकारी प्राथमिक पतपेढ्यांना भांडवलाचा पुरवठा करण्यासाठी 'बॉम्बे सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.' या नावाची बँक स्थापन झाली. आज महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा विस्तार झालेला दिसत आहे त्या गंगेची ही बँकच गंगोत्री होय.

वडिलांच्या, कै. सर लल्लूभाई सामळदास यांच्या प्रेरणेने म्हणा अगर प्रेमाने म्हणा किंवा स्वतःच्या बुद्धीस पटले म्हणून म्हणा वैकुंठराय हे या चळवळीत पडले. असे म्हणतात की, वैकुंठराय यांचा कल नामदार गोखले ह्यांच्या भारत सेवक समाजाकडे (सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी) होता. पण सहकारी चळवळीचे भाग्य थोर की तिला त्यांच्यासारखा सर्वस्व समर्पण करणारा एक धुरीण मिळाला.

वैकुंठराय यांचा जन्म १८९१ मधला. १९१० या वर्षी ते मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजमधून बी. ए. झाले. या परीक्षेत त्यांनी 'एलीस प्राइस' मिळविले होते. बी. ए. झाल्यानंतर लगेच ते १९१२ साली वडिलांनी स्थापन केलेल्या बॉम्बे सेंट्रल को. बँक, लि. (आताची महाराष्ट्र स्टेट को. बँक, लि.) मध्ये मॅनेजर म्हणून काम पाहू लागले. २०-२१ च्या तरुणाने, कॉलेजमधून नुकत्याच बाहेर पडलेल्या युवकाने,इतरत्र आकर्षक उद्योगधंद्यांची क्षेत्रं मोकळी असताना नवीन निघालेल्या सहकारी बँकेत तोकड्या तनख्यावर कामास प्रवृत्त व्हावे यात त्याचा ध्येयवेडेपणाच दिसून येतो आणि असा ध्येयवेडा तरुण त्यावेळी सहकारी चळवळीस न मिळता तर सहकारी चळवळीस आज जे विशाल स्वरूप प्राप्त झाले आहे ते झाले असते की नाही याबद्दल शंका वाटते. १९१५ साली सहकारी चळवळीची सर्वांगीण पाहणी करण्यासाठी सरकारने नेमलेल्या मॅकलगान कमेटीवर कै. सर लल्लूभाई सामळदास हे एक सभासद होते. त्यांच्याबरोबर वैकुंठराय भारतात सर्वत्र हिंडले. त्या प्रवासात त्यांना सहकारी संस्थांचे आणि ग्रामीण भागांचे जवळून अवलोकन करिता आले. त्यांच्या त्या विषयाच्या पुस्तकी ज्ञानाला त्यामुळे प्रत्यक्षाची जोड मिळाली.

कै. गोपाळ कृष्ण देवधर यांना वैकुंठराय हे सहकारी चळवळीतील आपले गुरु मानीत. पौराणिक कथेप्रमाणे वैकुंठातून गोपाळ कृष्ण निघाले; पण महाराष्ट्रात सहकारी चळवळीतून गोपाळ कृष्णातून वैकुंठ निघाले असेच म्हणावे लागेल. सहकारी तत्त्व विशद करून त्यास व्यावहारिक रूप कसे यावे याचा वस्तुपाठ देण्यासाठी वैकुंठराय यांनी अनेक लहान-मोठे लेख लिहिले, भाषणे केली, पुस्तके लिहिली. मनुष्याच्या ठिकाणी एखाद्या तत्त्वाविषयी आत्यंतिक निष्ठा असल्याशिवाय तो तिचा पुरस्कर्ता होऊच शकत नाही. आणि जो असा पुरस्कर्ता असतो तोच कार्यकर्ता होतो आणि त्याचेच लोक ऐकतात व मानतात. एरव्ही इतरांच्या बाबतीतील 'बोलाची कढी' लोक पानात देखील पडू देत नाहीत. वैकुंठराय हे सहकारी चळवळीत पडले हे त्या वेळी तरी एक आश्चर्यच होते. आज सहकारी चळवळ ही 'सुजला' व 'सुफला' झालेली आहे. त्या वेळी ती 'निर्जला' आणि 'निष्फळा' होती. एका उद्योगपतीचा सुशिक्षित मुलगा. मनात आणले असते तर त्याने आपले कार्यक्षेत्र मुंबई शहरच ठरविले असते, आणि त्याच्या तसा करण्याबद्दल त्यास कोणी दोषही दिला नसता. तथापि ते या सुलभ गोष्टी बाजूस सारून सहकारी चळवळीत पडले आणि आपल्या कार्यकुशल कर्तृत्वाने त्या चळवळीस सुप्रतिष्ठा प्राप्त करून दिली आणि तीस भारतीय नियोजनाचा एक अविभाज्य अवयव असे स्पृहणीय स्थान मिळवून दिले. वैकुंठराय सहकारी चळवळीशी समरस झाले म्हणूनच त्यांच्या कार्याचा लाभ ग्रामीण जनतेला घेता आला. अन्यथा ते शहरी सुशिक्षितांनाच माहीत झाले असते.

१९१२ते२२ या काळात ते बँकेत मॅनेजर म्हणून काम करीत होते आणि पुढे १९२३ ते ४६ या मुदतीत त्यांनी बँकेचा गाडा मॅनेजिंग डायरेक्टर या नात्याने चालविला. एकूण ३४ वर्षे ते एका संस्थेत राहिले. जणू जुन्या काळातील पतिव्रताच! महाराष्ट्रापुरते बोलावयाचे तर महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ही मुंबई प्रॉव्हिन्शिअल को. बँकेच्या (मुंबई राज्य सहकारी बँकेच्या) विकासाशी समकक्ष राहूनच विस्तार पावली ही वस्तुस्थिती आहे. बँकेचे विकसन हे वैकुंठराय यांच्या कार्यक्षमतेचे आणि कर्तव्य-तत्परतेचेच फळ होय. बँकेत प्रवेश केल्यानंतर त्यांच्यापुढे प्रामुख्याने दोन प्रश्न उभे राहिले असले पाहिजेत. एक, नवीन बँकेची कारभारी घडी सुव्यवस्थित बसविणे आणि सहकारी चळवळीचे लोण ग्रामीण जनतेपर्यंत नेऊन पोचविणे. त्यापेक्षा दुसरे कार्य अवघड होते. कारण 'सहकार' हे तत्त्व बोलावयास व परस्पर त्याचा बोलबाला करावयास ठीक होते. पण ते व्यवहारात साकार करणे त्या वेळच्या परिस्थितीत दुर्घट होते. वर सांगितल्याप्रमाणे राष्ट्रीय पुढारी त्या वेळी या चळवळीस फारसे अगर मनापासून अनुकूल नव्हते. दुसरे, सावकारांचे ग्रामीण जनतेशी असलेले संबंध चिवट होते. पण अशा प्रतिकूल परिस्थितीतही वैकुंठराय यांनी अविश्रांत परिश्रम करून भीज पावसाप्रमाणे आपले कार्य अविरत चालू ठेवले. त्यांच्या या क्षेत्रातील अजोड कार्याबद्दल महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, लि.चे विद्यमान चेअरमन डॉ. धनंजयराव गाडगीळ त्यांच्याबद्दलच्या एका लेखात लिहितात "ह्या राज्यातील सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीतील कोणतीही विशिष्ट बाब घेतली तर तिचा इतिहास व सद्यःस्थिती यांविषयी श्री. वैकुंठभाई मार्मिक विवेचन

करू शकतील इतके या कारभाराशी त्यांचे सततचे निकट साहचर्य आहे व इतका सखोल व तपशीलवार अभ्यास त्यांनी समग्र चळवळीचा केलेला आहे. प्रत्येक ठिकाणच्या व्यवहाराची प्रत्यक्ष माहिती असावी हा कटाक्ष त्यांनी प्रथमपासून बाळगला, यामुळे सहकारी कार्यपद्धतीच नव्हे तर स्थानिक परिस्थिती व स्थानिक कार्यकर्ते यांची श्री. वैकुंठभाई यांस इत्थंभूत माहिती आहे. कार्यतत्परता व निरलसता यामुळे श्री. वैकुंठभाई यांस प्रत्येक सपर्शील अवगत झाला. तर कुशाग्रबुद्धी व शुद्ध तात्त्विक बैठक यांमुळे त्यांस प्रत्येक प्रश्नाचे खरे स्वरूप समजू शकले. या सर्वांस अनाग्रही स्वभाव व विनम्र वागणूक यांची जोड मिळाल्यामुळे कोणासही भासू न देता अनेक वर्षे या राज्यातील सहकारी चळवळीचे बिगर–सरकारी धुरीणत्व त्यांच्याकडे प्रत्यक्षाने राहिले व ही गोष्ट या चळवळीस फार फलदायी ठरली. ”

१९५६ या वर्षी ते मुंबई राज्याचे अर्थ व सहकारमंत्री झाले. या घटनेने सहकारी चळवळीचे सरकारी धुरीणत्वही त्यांच्याकडे येऊन तत्संबंधी नेतृत्वाची एक प्रकारे सांगताच झाली. या त्यांच्या कारकीर्दीत 'सहकारी चळवळीत सरकारी भागीदारी' आणि 'सहकारी साखर कारखाने' या दोन युगप्रवर्तक गोष्टी घडून आल्या आणि सहकारी चळवळीचे दृश्य फळ त्यांनी जनतेच्या पदरात टाकले.

बँकेचे वरिष्ठ अधिकारी म्हणून त्यांचा कारभार आणि वागणूक आदर्श होती. कामात दिरंगाई हा शब्द त्यांच्या शब्दकोशात नव्हता आणि त्यामुळे बँकेलाही तो त्या वेळी अज्ञात होता. वैकुंठराय म्हणजे वक्तशीरपणा, विनम्रता आणि विनय ! हाताखालील नोकरवर्गाशी वागणे म्हणजे प्रत्यक्ष सौजन्य ! बँकेचे सर्व ऑफिस म्हणजे एक कुटुंबच असे ते मानीत. त्यामुळे त्यांच्या कारकीर्दीत बँकेत काही परंपरा, पायंडे निर्माण झाले, भावबंध निर्माण झाले. स्वसुखाने पाळली जाणारी बंधने निर्माण झाली. वरिष्ठ व कनिष्ठ यांत इष्ट असे परस्पर सहकार्य साकार झाले होते. वृत्ती विनम्र आणि विनर्या. राहणी साधी. हव्यास कशाचाच नाही; पण ध्यास ध्येयाचा. भारत सरकारने दिलेल्या 'पद्मभूषण' या पदवीबद्दलही ते 'पद्मपत्रमिव'च वागले !

महात्माजींबद्दल त्यांना अपार आदर होता. १९४२ साली ते धुळे येथे बँकेच्या शाखेस भेट देण्यासाठी आले होते. त्या वेळी महात्माजींना अटक झाल्याचे त्यांना समजले. त्या दिवशी त्यांनी अनशन केले पण अनध्याय नाही ! महात्माजींच्या खादी आणि ग्रामोद्योग कार्यासही त्यांनी पुढे वाहून घेऊन त्या चळवळींचीही उत्कृष्ट सेवा केली. सहकाराचे जे एक तत्त्व काटकसर, ते वैकुंठराय यांच्या कारकीर्दीच्या रूपाने साकार झाले होते. त्यांनी 'आदर्श' आणि 'वास्तव' यांचे मीलन घडवून आणण्याचा सतत प्रयत्न केला. सहकारात राजकारण आणू नये, नव्हे कटाक्षाने ते टाळावे, असे ते आग्रहाने प्रतिपादीत.


आज सहकारी चळवळीस सुप्रतिष्ठिता लाभून ती स्थिरपद झाली आहे. आजच्या सहकारी चळवळीस ज्यांनी आपल्या सेवेने जनमानसात आशेचे आणि आदराचे स्थान निर्माण करून दिले आहे. त्यांत वैकुंठराय यांचा क्रम मेरुमण्यासारखा आहे. त्यांच्या अविरत, अनासक्त आणि अनमोल कर्तृत्वामुळेच हा वटवृक्ष विशाल आणि शाखाबहुल झाला आहे. त्यांच्या पूज्य स्मृतीला वंदन करून ही आदरांजली अर्पण करितो.

—खं. म. खंडागळे
बारामती

ठाकरसी फॅब्रिक्स
फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती: सॅन्फोराइज्ड कापड SANFORIZED
ठाकरसी शर्टिंग म्हणजे रुबाबदार कापड
डिझाइनचे किंवा साधे, हवी त्याची करा निवड
ठाकरसी ग्रुप ऑफ मिल्स



BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting



MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

## हिंदी बँकिंगची सर्वांगीण वाढ

### बिगर-शेड्यूल्ड बँकांत घट

भारतातील बँकांसंबंधी आकडेवार माहितीचे रिझर्व्ह बँकेचे १९६४ चे वार्षिक प्रसिद्ध झाले आहे. त्यावरून असे दिसते की शेड्यूल्ड बँकांचे वसूल भांडवल व रिझर्व्ह १९६३ अखेर ८३·३ कोटी रुपयांचे होते, ते १९६४ अखेर ८८·२ कोटी रुपयांचे झाले. ठेवीत ३४३ कोटी रुपयांची आणि कर्जात २७२ कोटी रुपयांची वाढ झाली. इन्व्हेस्टमेंट्समध्ये ८३ कोटी रुपयांची वाढ झाली. एकूण उत्पन्न व खर्च अनुक्रमे १६१ कोटी रु. व १३० कोटी रु. होते, ते १९० कोटी रु. व १५५ कोटी रु. झाले. त्यामुळे करापूर्वीचा नफा ३१ कोटी रुपयांचा ३४·८ कोटी रुपयांवर गेला.

बिगर-शेड्यूल्ड बँकांची संख्या १९६३ अखेर १७३ होती, ती १९६४ अखेर फक्त ८० उरली आहे. व्यापारी बँकांच्या एकूण कचेऱ्यात ३२७ ची भर पडली. १९६३ अखेर प्रत्येक ८३,००० लोकसंख्येस एक बँक कचेरी होती; १९६४ अखेर ८०,००० लोकसंख्येस एक बँक कचेरी असे प्रमाण पडते.

## मोटर वाहनांचे तुलनात्मक आकडे

(आकडे हजारांचे)

| | १९५० | | १९६० | |
|---|---|---|---|---|
| | मोटार वाहनांची संख्या | एकूणशी प्रमाण% | मोटार वाहनांची संख्या | एकूणशी प्रमाण% |
| यू. एस. ए. | ४३,७७४ | ६९·२ | ८६,३११ | ५१·३ |
| कॅनडा | २,१९५ | ३·५ | ६,४५२ | ३·८ |
| लॅटिन अमेरिका | १,७२२ | २·७ | ६,४०१ | ३·८ |
| प. युरोप | ८,५०० | १३·५ | ४६,३८३ | २७·६ |
| आफ्रिका | १,११५ | १·८ | ३,४१२ | २·० |
| आशिया | ७०३ | १·१ | ८,८२२ | ५·३ |
| ऑस्ट्रेलिया | १,६१७ | २·५ | ४,५७५ | २·७ |
| कम्युनिस्ट गट | ३,५७४ | ५·६ | ५,९०४ | ३·५ |
| एकूण | ६३,२०० | १००·० | १६८,२७३ | १००·० |

भारतात ३१ मार्च, १९६२ रोजी ८,४४,५५२ मोटर वाहने उपयोगात होती. त्यापैकी १,२६,५·१९मोटर सायकली, १९,१२८ ऑटोरिक्षा, २२,९९६ जीप्स, ३,११,२०५ खाजगी मोटर-गाड्या, २७,२६७ टॅक्सी, ६२,०५९ बसेस व २,१२,१२२ माल-वाहतुकीच्या ट्रक्स होत्या.

### नव्या घरबांधणीस ला. इं. कॉ. चे पैसे मिळणार नाहीत

सध्याची आणीबाणीची परिस्थिती लक्षात घेऊन, लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचे फंड चालू आर्थिक वर्षात नव्या घर-बांधकामासाठी मिळणार नाहीत, असे जाहीर झाले आहे. जी बांधकामे चालू आहेत किंवा ज्यांना पैसा देण्याचे बंधन स्वीकारले गेले आहे, अशांना हा निर्णय लागू नाही. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ला. इं. कॉर्पोरेशनने घरबांध-कामासाठी ६० कोटी रुपये द्यावयाचे होते. त्यापैकी ४५ कोटी रु. आतापर्यंत देऊन झाले आहेत.

## रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर श्री. दिवेकर ह्यांची सेवानिवृत्ती

### लहान बँकांच्या विलीनीकरणाची कामगिरी

रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर, श्री. सी. एस. दिवेकर हे सेवानिवृत्त होत आहेत. व्यापारी बँकांच्यावर देखरेख आणि नियंत्रण ठेवण्याचे काम त्यांच्याकडे गेली काही वर्षे होते. स्वतःच्या पायावर उभे राहू न शकणाऱ्या बँकांना, मोठ्या बँकेत विलीन होण्यास त्यांनी प्रवृत्त केले. त्यामुळे २३३ बँका कमी झाल्या, त्यापैकी ४५ बँकांचे सक्तीने विलीनीकरण करावे लागले, १३३ स्वखुषीने विलीन झाल्या आणि ५३ बंद पडल्या; त्यांना लायसेन्स नाकारण्यात आला, त्यांनी बिगर-बँकिंग कंपन्यात रूपांतर केले अथवा लिक्विडेशनमध्ये गेल्या. सध्या चालू असलेल्या ११० बँकांपैकी ६१ बँकांना लायसेन्स आहे, ८ बँकांना (स्टेट बँक व तिच्या दुय्यम बँका) लायसेन्सची आवश्यकता नाही आणि ४१ बँकांना लायसेन्स दिलेला नाही व नाकारलेलाही नाही.

### जेसप अँड कंपनी, कलकत्ता

वरील कंपनीचे संरक्षण साहित्याच्या उत्पादनातील स्थान आणि तिचा गैरकारभार, ही लक्षात घेऊन भारत सरकारने कंपनीच्या २०४ लक्ष रु. वसूल भांडवलात आपले बहुमत करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी ११,२३,३०० भाग भागीदारां-कडून खरीदून एकूण भागांपैकी ५५% भागांचे मालक बनणार आहे. खरेदीची किंमत ठरविण्याचे काम सुप्रीम कोर्टाच्या एका सेवानिवृत्त न्यायाधीशाकडे सोपविले जाईल.

### इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्सचे अध्यक्ष श्री. मा. पु. चितळे

श्री. माधव पुरुषोत्तम चितळे ह्यांची दि इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडियाचे अध्यक्षपदी निवडणूक झाली आहे. त्यांचे वय फक्त ४३ वर्षांचे आहे. त्यांचा जन्म वाई येथे झाला व पुढे ते पुण्याच्या एस. पी. कॉलेजात शिकले. पोद्दार कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये ते पाच वर्षे प्रोफेसर होते. चार्टर्ड अकौंटंट म्हणून ते गेली १८ वर्षे काम करीत आहेत.

### २० रुपयेवाली नोट निघणार

भारत सरकारने २० रुपये किंमतीच्या चलनी नोटा छाप-ण्याचे ठरविले आहे. चलनी नोटांसाठी लागणारा कागद दुर्मिळ परदेशी हुंडणावळ खर्चून आयात करावा लागतो. त्यात बचत करण्यासाठी ही नवी नोट काढण्यात येत आहे. होशंगाबाद येथे सिक्युरिटी कागदाच्या उत्पादनासाठी गिरणी स्थापन करण्यात येत आहे, परंतु तिचा कागद मिळू लागण्यास आणखी निदान १५ महिने लागतील.

### कै. वैकुंठभाईच्या तैलचित्राचे अनावरण

खादी कमिशनचे पहिले चेअरमन, कै. वैकुंठभाई मेहता ह्यांच्या तैलचित्राचे अनावरण विलेपार्ले येथील कमिशनच्या कार्यालयांत राज्यपाल डॉ. पी. व्ही. चेरियन ह्यांच्या हस्ते करण्यात आले.

### हिंदुस्थान स्टील कंपनीला नफा

'हिंदुस्थान स्टील' ही कंपनी स्थापन झाल्याला आता ११ वर्षांचा काळ लोटला आहे. चालू वर्षी ह्या कंपनीला प्रथमच ४ कोटी रुपयांचा नफा झाल्याची माहिती मिळते. ह्या कंपनीच्या मालकीचे ३ पोलाद कारखाने आहेत. त्यापैकी रूरकेला येथे जर्मनीच्या साह्याने स्थापन केलेल्या कंपनीलाच ३·५ कोटी रुपये नफा झाला आहे. दुसऱ्या दोन कंपन्या म्हणजे दुर्गापूर व भिलई येथील पोलादाचे कारखाने होत.

SCG-1 HIN

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

**हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ**

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



नवल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ७६[illegible]

### मराठा चेंबरचा निर्यात विभाग

सध्याची हुंडणावळीची विकट परिस्थिती लक्षात घेऊन भारत सरकारने निर्यातवाढीला प्रोत्साहन देण्याचे ठरविले आहे. या राष्ट्रीय कार्यामध्ये अल्पसा वाटा म्हणून पुणे येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजने नुकताच निर्यात विभाग सुरू केला आहे.

महाराष्ट्रातील कारखानदार-निर्यातदारांना सर्व प्रकारची मदत व माहिती देण्याची कल्पना हा विभाग सुरू करण्यामागे आहे. सदर विभाग निर्यातविषयक उपयुक्त पुस्तके, सरकारी प्रकाशने तसेच भारतीय मालाच्या आयातदारांची नावे, विविध देशांमधील आयात, कस्टम्स, अबकारी कर, परदेशी हुंडणावळ, इत्यादि संबंधीची माहिती पुरवेल. त्याचप्रमाणे माल निर्यात करण्याची पद्धत, आयातकर आणि अबकारी कर यांवर रिफंड मिळविणे, जहाजभाडे, विमा, जाहिरात, प्रदर्शने, इंपोर्ट एन्टायटलमेन्ट, इत्यादि संबंधींची माहितीही सदर विभागातर्फे पुरविण्यात येईल. तसेच आवश्यक ते अर्जहि उपलब्ध करून देण्याची सोय करण्यात आली आहे. याशिवाय वेळोवेळी चर्चासत्रे, परिषदा, शिक्षणवर्ग व प्रदर्शने भरविण्याची कल्पना आहे. फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश व अरेबिक ह्या भाषांमधील पत्रे, परिपत्रके, पुस्तिका इत्यादींचे इंग्रजी मध्ये किंवा इंग्रजी पत्रांचे वरील भाषांमध्ये भाषांतर करून देण्याची व्यवस्थाही सदर विभागामार्फत करण्यात आली आहे.

विशेष माहितीसाठी कार्यवाह, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, टिळकरोड, पुणे ९ या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

---

### संरक्षणविषयक उत्पादनाला साह्य

संरक्षणविषयक उत्पादनाला साह्य करण्याच्या दृष्टीने स्टेट बँकेने आपल्या कर्जपुरवठ्याचे नियम थोडे सैल केले आहेत. पाकिस्तान आणि भारत ह्यांच्यात संघर्ष सुरू झाल्यावर स्टेट बँकेने छोट्या उद्योगधंद्यांना दिलेल्या कर्जात ९२ लाखांची वाढ झाली. भारत व पाकिस्तान ह्यांच्या सरहद्दीवर असलेल्या ८ जिल्ह्यांतीलच ही वाढ आहे. युद्धाची धुमश्चक्री चालू असताना सुद्धा आघाडीपासून काही थोड्या मैलांवर असलेल्या स्टेट बँकेच्या शाखा नेहमीप्रमाणे चालू ठेवण्यात आल्या होत्या आणि लोकांना सर्व प्रकारच्या वाजवी सवलती देण्यात येत होत्या. दिल्ली येथे स्टेट बँकेची एक नवी शाखा उघडण्यात आली. त्या वेळी बँकेच्या स्थानिक बोर्डाचे अध्यक्ष न्यायमूर्ती दास ह्यांनी ही माहिती सांगितली.

---

### वनस्पती तुपाची किंमत का वाढली ?

१९६४ साली वनस्पतीचे उत्पादन ३,५०,००० टन झाले होते, ते १९६५ मध्ये ४,००,००० टनांवर जाईल अशी अपेक्षा आहे. तरी सुद्धा, वनस्पतीची किंमत वाढली आहे. भुइमुगाच्या तेलाच्या किंमतीवर वनस्पतीची किंमत अवलंबून असते आणि त्या तेलाच्या किमतीत वाढ झाल्यावर वनस्पतीच्या किमतीत वाढ होणे अपरिहार्य आहे. वनस्पतीचा मोठा खप कमी प्राप्तीच्या लोकांत होतो, तेव्हा त्याची किंमत मर्यादित राहणे आवश्यक आहे. १,५०,००० टन सोयाबीन तेलाची आयात करण्यात यावी म्हणजे भुइमुगाच्या तेलाचा तुटवडा जाणवणार नाही आणि त्याची किंमत स्थिर राहील, असे वनस्पतीच्या कारखानदारांनी सुचविले आहे. परंतु ह्या आयातीसाठी परदेशी हुंडणावळ उपलब्ध करून देणे सरकारला आता शक्य होणार नाही.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | १०·२२ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १५·७८ ,, |
| ठेवी | ... | रु. | ४४३·६२ ,, |
| खेळते भांडवल | ... | रु. | ४८१·१५ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.


स्थापना १९१८

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग — सांगली (महाराष्ट्र)

## १९६६-६७ पासून साखरेवर नियंत्रण नको

१९६४ च्या ऑगस्टमध्ये नियोजन मंडळाचे सल्लागार, डॉ. एस्. आर्. सेन ह्यांच्या अध्यक्षतेखाली शुगर इन्क्वायरी कमिशन नेमण्यात आले होते. कमिशनने आपल्या अहवालात, १२ लक्ष टनांचा 'बफर स्टॉक' झाल्यानंतर १९६६-६७ पासून साखरेवरील नियंत्रण काढून टाकण्यात यावे, असे सुचविले आहे. एक्साइज ड्यूटीमधील रीबेटची योजना चालू रहावी अशीही त्याची सूचना आहे. पूर्वीच्या मोसमात झालेल्या उत्पादनाच्या किमान २०% एवढा साठा पुढे ओढणे कारखान्यांना सक्तीचे करावे.

## उसाच्या उत्पादनात महाराष्ट्र आघाडीवर

एकूण लागवड, उसाचे उत्पादन आणि दर एकरी प्रमाण, ह्या संबंधातील १९६४–६५ चे तुलनात्मक आकडे खालीलप्रमाणे आहेत :—

| | सबंध भारत | महाराष्ट्र |
|---|---|---|
| लागवड | ६२.८७ लक्ष | ३.५२ लक्ष |
| उसाचे उत्पादन | १२२१.८७ लक्ष टन | १२०.४८ लक्ष टन |
| दर एकरी प्रमाण | १९.४ टन | ३४.२ टन |

दर एकरी उसाच्या उत्पादनात महाराष्ट्राचे स्थान सर्वोच्च आहे, महाराष्ट्रातील उसाची लागवड १९५५-५६ ते १९६४-६५ ह्या मुदतीत १.८९ लक्ष एकरांची ३.५२ लक्ष एकर झाली आणि उसाचे उत्पादन ५० लक्ष टनांचे १२० लक्ष टनांवर गेले; दर एकरी उत्पादनही २६.५ टनांचे ३४.२ टन झाले. तरी सुद्धा त्यात सुधारणा होण्यास वाव आहे. केन सेस फंडाचा त्याच्या उद्देशांवर (संशोधन, विकास आणि पाणीपुरवठा) पुरेसा खर्च होत नाही, हे खालील तक्ता दर्शवितो :—

### कराच्या रकमेचा उद्देशांवर खर्च करा

| | सेस/परचेस टॅक्सची वसुली | उद्देशांवर खर्च |
|---|---|---|
| १९६१–६२ | १५१ | १०.५२ लक्ष रु. |
| १९६२–६३ | १६० | ११.१८ लक्ष रु. |
| १९६३–६४ | १७२ | ३०.५६ लक्ष रु. |

सेस/परचेस टॅक्सच्या उत्पन्नाचा मोठा भाग उसाच्या धंद्याचे विकासावरच खर्च केला जावा, असे शुगर इनक्वायरी कमिशनने सुचविले आहे.

## संरक्षण साहित्यासाठी सोने मिळविण्याचा प्रयत्न

हिंदुस्थानचे संरक्षण करण्यासाठी लागणारे अनेक प्रकारचे साहित्य परदेशातून विकत घेण्यासाठी भारत सरकारने नवे सुवर्णरोखे काढले आहेत. ह्या सुवर्णरोख्यासंबंधी लोकांची प्रतिक्रिया अद्याप स्पष्ट झालेली नाही. परंतु ह्या रोख्यांच्या योजनेत काळाबाजारवाल्यांनी दडविलेले सोने बाहेर काढण्यावर भर दिलेला दिसत आहे. दडविलेले सोने किती आहे ह्याचा नक्की अंदाज करणे अवघड आहे. एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याच्या मताने भारत स्वतंत्र झाल्यावर दरसाल ५० कोटी रुपयांचे सोने चोरट्या मार्गाने आयात करण्यात येत होते. ह्या हिशेबाप्रमाणे सुमारे ९०० ते १,००० कोटी रुपयांचे दडविलेले सोने असले पाहिजे. भारत स्वतंत्र होण्यापूर्वी देशात किती सोने होते ह्याचा अंदाज करणे तर आणखीच कठीण आहे. भारत हा देश पूर्वी सुवर्णभूमी म्हणून प्रसिद्ध होता; तेव्हा शेकडो वर्षे आयात करण्यात आलेल्या सोन्याचा साठा असला पाहिजे.

## भारतासाठी सोविएत ट्रान्समीटर

अलीकडेच नवी दिल्ली येथे भारत सरकार व सोविएत सरकार यांच्या दरम्यान, सोविएत युनियनने भारताला १००० किलोवाट शक्तीचा मीडियम-वेव्ह-ट्रान्समीटर देण्याचा करार होऊन त्यावर सह्या झाल्या. देशात पूर्व भागात बसविण्यात येणारा हा मीडियम-वेव्ह-ट्रान्समीटर हा त्या भागातील सर्वात सामर्थ्यशाली ट्रान्समीटर असेल. ट्रान्समीटर, संदेशग्राहक-व्यवस्था, आराखडा, योजना आणि सोविएत तज्ज्ञांचे शिष्टमंडळ या सर्वांसाठी मिळून ८४,३४,४०० रुपये खर्च पडणार आहेत. साधनसामग्रीची किंमत रुपयात स्वीकारली जाणार आहे. हा व्यवहार पाच वर्षांच्या व्यापारविषयक कर्जव्यवस्थेनुसार होणार असून त्यावर द. सा. द. शे. अडीच टक्के या दराने व्याजाची आकारणी होणार आहे.

## एशिअन डेव्हलपमेंट बँकेची सनद

आशियातील देशांचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या एशिअन डेव्हलपमेंट बँकेच्या सनदेचा मसुदा तयार करण्यासाठी बँकॉक येथे संबंधितांची एक बैठक घेण्यात आली. बँकेच्या सनदेचा विचार करण्याचे काम बैठकीत करण्यात आले. ह्या सनदेत ६६ कलमे असून त्याशिवाय दोन परिशिष्टे आहेत. बँकेच्या सभासदांचे मतदानाचे हक्क, संचालक मंडळ आणि भाग–भांडवल गोळा करण्याची पद्धत ह्यासंबंधी सनदेत प्रामुख्याने तरतूद करण्यात आली आहे. एकूण मतांपैकी ८० टक्के मते भांडवलाच्या भरण्याप्रमाणे वाटण्यात येतील आणि बाकीची सभासदांत सारखी वाटण्यात येतील. बँकेचे भांडवल १०० कोटी डॉलर्सचे आहे. तीन देशांनी म्हणजे अमेरिका, जपान व थायलँड ह्यांनी भांडवलातील आपला हिस्सा जाहीर केला आहे. अमेरिका व जपान प्रत्येकी २० कोटी डॉलर्स देणार असून थायलँड २ कोटी डॉलर्स देणार आहे.

## सुताच्या सहकारी गिरणीचे उद्घाटन

कोइमतूर येथील जिल्हा सहकारी सुताच्या गिरणीचे उद्घाटन मद्रासच्या मुख्यमंत्र्यांनी केले. चालू वर्षी राज्यात सहकारी क्षेत्रात अशा प्रकारच्या ९ गिरण्या उभारण्यात येणार आहेत. त्यांपैकी ही चौथी गिरणी आहे, आणि राज्यातील सहकारी गिरण्यांपैकी ८ वी आहे. गिरणीचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री श्री. भक्तवत्सलम् ह्यांनी अशी आशा प्रदर्शित केली, की आणखी अनेक गिरण्या उभारण्याची ती नांदीच ठरेल. ह्या गिरणीसाठी सुमारे ६७.७९ लाख रुपये भांडवल लागले असून त्यामधील बहुतेक यंत्रसामग्री देशातच बनविण्यात आलेली आहे. यंत्रसामग्रीपैकी काही जपानकडून मागाहून पैसे देण्याच्या अटीवर आयात करण्यात आली असून काही यंत्रसामग्री ब्रिटनकडून आणलेली आहे.

## भारत–चेकोस्लोव्हाकिआतील व्यापार

भारत आणि चेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्या दरम्यान ३ वर्षे मुदतीचा एक व्यापारी करार करण्यात येणार आहे. ह्या कामी चेक सरकारचे एक प्रतिनिधिमंडळ लवकरच भारतात येणार आहे. भारताचे अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी चेकोस्लोव्हाकिआचा छोटा दौरा करून परत आल्यावर त्यांनी ही माहिती सांगितली. ते म्हणाले, की भारत चेकोस्लोव्हाकिआकडून १०० कोटी रुपयांचा एंजिनिअरिंगचा व इतर माल आयात करणार आहे आणि ५० कोटी रुपयांचा माल त्या देशाला निर्यात करणार आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळात ही व्यापारी देवघेव करण्यात येणार आहे. तो देश भरभराटीत असून तेथे बेकारी मुळीच नाही असेही ते म्हणाले.

## इंडिअन ऑइल कॉर्पोरेशनची प्रगती

सरकारी मालकीच्या इंडिअन ऑइल कॉर्पोरेशनने प्रगतीचा आणखी एक टप्पा गाठला आहे. काही दिवसांपूर्वी विमानांना लागणारे तेल पुरविण्याच्या क्षेत्रात कॉर्पोरेशनने पदार्पण केले. तेल पुरवठ्याच्या ह्या क्षेत्रात जोराची स्पर्धा असते, आणि गिऱ्हाइकाकडून उत्कृष्ट दर्जाच्या मालाचीच अपेक्षा करण्यात येत असते. कॉर्पोरेशनने फिजीकडे जाणाऱ्या एका एअर इंडिआ बोइंग विमानाला प्रथमच तेल पुरविले. भारताच्या विमान दलाला लागणारे खास प्रकारचे इंधन पुरविण्यास कॉर्पोरेशनने काही महिन्यांपूर्वीपासून सुरुवात केलेली आहे. आता देशातील १९ हवाई बंदरांवर विमानांना तेल पुरविण्याची व्यवस्था कॉर्पोरेशनने सुरू केली आहे. कॉर्पोरेशनच्या सध्याच्या व्यापात आयात करण्यात आलेल्या पेट्रोलजन्य पदार्थांच्या वितरणाचे काम आहे. त्याशिवाय गोहाटी आणि बरौनी येथील तेलपुरवठ्याच्या कारखान्यांतून तयार होणाऱ्या मालाचेही वाटप कॉर्पोरेशन करते. कॉर्पोरेशनच्या मालकीचा तिसरा कारखाना गुजरात राज्यात कोयाली येथे असून त्या कारखान्यात तेलाच्या उत्पादनास नुकताच प्रारंभ झाला आहे, कोचीन येथील तेलशुद्धीच्या कारखान्याचे काम बरेच प्रगत झाले आहे, आणि मद्रासमधील कारखान्याची उभारणी बहुधा १९६८ मध्ये पुरी होईल. पुढच्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस कॉर्पोरेशन देशाला लागणाऱ्या पेट्रोलच्या पदार्थांपैकी बराच मोठा भाग स्वतःच्या मालकीच्या कारखान्याच्या उत्पादनातून पुरवू शकेल. कॉर्पोरेशनच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती वाढत चालल्यामुळे परदेशीय चलनांची बचत मोठ्या प्रमाणावर होत आहे. १९७१ मध्ये ७५ कोटी रुपयांचे परदेशीय चलन वाचेल असा अंदाज आहे.

## अपुऱ्या पावसामुळे वीजपुरवठ्यात कपात

अपुऱ्या पावसामुळे सर्व भारतात कमी–अधिक प्रमाणात शेतीच्या उत्पादनात घट होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. पण पावसाच्या लहरीचा परिणाम फक्त अन्नधान्याच्या व शेतीच्या इतर मालावर होतो असे नाही. पाणी अडवून त्याच्या साह्याने निर्माण करण्यात येणाऱ्या विजेवरही विपरीत परिणाम होणे अटळ असते. राजस्थानातील विजेच्या उत्पादनात घट झाल्यामुळे राज्यात घरगुती कामासाठी व व्यापार धंद्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विजेत काटछाट करावी लागली आहे. इतकेच काय पण शहरातील विजेच्या दिव्यासाठी करण्यात येणाऱ्या वीज पुरवठ्यातही ५० टक्के कपात करावी लागली आहे. विजेच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे उद्योगधंद्यांवरही परिणाम झाला आहे. औद्योगिक कारखान्यांना करण्यात येणाऱ्या पुरवठ्यात कमीत कमी कपात करण्याचे प्रयत्न चालू आहेत. छोट्या उद्योगधंद्यांच्या विजेच्या पुरवठ्यात व शेतीसाठी लागणाऱ्या पुरवठ्यात मात्र काहीच कपात करण्यात आलेली नाही. राजस्थानमधील वीजपुरवठ्यात आलेले हे विघ्न पुढील पावसाळ्यात जोराचा पाऊस झाला तरच दूर होण्यासारखे आहे. राजस्थानला नर्मदा योजनेपासून वीज देण्यात येणार आहे. पण त्याला अद्याप अवधी आहे. पंजाबमधील भाक्रा धरणाच्या उजव्या बाजूला रशियाच्या मदतीने एक वीजकेंद्र उभारण्यात येत आहे. ते पूर्ण झाल्यावर पंजाब राजस्थानला अधिक वीज पुरवू शकेल. पण त्या केंद्राचे काम पूर्ण होण्यास अद्याप २ वर्षे तरी लागणार आहेत. असे असले तरी दोन वर्षांनी राजस्थानातील विजेची मागणीही वाढणार आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. अशा परिस्थितीत उष्णतेवर चालणाऱ्या वीजकेंद्रांची ठिकठिकाणी उभारणी करून ह्या प्रश्न सोडवावा लागेल.


# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

" चिरमुले निकेतन ", १४३/१४९ भवानी पेठ

सातारा–शहर

*दि. १८-७-६५ पासून ठेवींवरील व्याजांच्या दरांत खालीलप्रमाणे वाढ झालेली आहे.*

## मुदतीच्या ठेवी

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | द. सा. द. शे. | ६=२५ |
| २ वर्षे | ,, | ६=५० |
| ३ वर्षे | ,, | ६=७५ |
| ५ वर्षे | ,, | ७=२५ |
| ७ वर्षे | ,, | ७=५० |
| ९ वर्षे व जास्त | ,, | ७=६२ |

सेव्हिंग्ज बँक खाते:—दि. १–२–६५ पासून ४ टक्के

*तसेच अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक दराने स्वीकारल्या जातील.*

याबाबत आमच्या कोणत्याही शाखेत अधिक माहिती मिळू शकेल.

# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

| : मुख्य कचेरी : | : विभागीय कचेरी : |
|---|---|
| ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई | महाल : नागपूर. |
| टेलिफोन नं. २५५४७४–७५, | तारेचा पत्ता : |
| २५६२१४ २५४७८१ | फार्म बँक |

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शिव (१२) माटुंगा (१३) अंधेरी.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | |
|---|---|
| भरपाई झालेले भांडवल ... | ५,३०,५१,००० |
| गंगाजळी व फंड ... | १,५६,७५,००० |
| ठेवी ... | ३९,१४ ३२,००० |
| खेळते भांडवल ... | ९१,४८,३५,००० |

भारतातील प्रमुख शहरी हुंड्या, बिले वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.
श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

**दिल्लीत मोटारींच्या वाढत्या चोऱ्या**—लोकसभेत सादर करण्यात आलेल्या आंकडेवार माहितीप्रमाणे दिल्लीतील मोटारींच्या चोऱ्यांत वाढ होत आहे. १९६३ साली ५३ मोटारी चोरीस गेल्या होत्या; त्यांपैकी ५१ चोऱ्यांचा तलास लावण्यात आला. १९६४ मध्ये ६४ मोटारी चोरीस गेल्या व त्यांपैकी ५७ मोटारी परत मिळविण्यात आल्या. १९६५ च्या जानेवारी-पासून ऑक्टोबर अखेरपर्यंत ७५ मोटारी चोरण्यात आल्या; त्यांपैकी ६० चोऱ्यांचा तपास लावण्यात आला.

**जागतिक बँकेचे मतप्रदर्शन** — भारताच्या शेतीच्या उत्पादनाबद्दल जागतिक बँकेच्या प्रतिनिधींनी टीका केली आहे. त्यांच्या मताने भारताजवळ शेतीविषयीचे आधुनिक तंत्रज्ञान आहे, पैसा आहे आणि कष्ट करणारा शेतकरीही आहे. परंतु आहे त्या साधनसंपत्तीचा काटकसरीने उपयोग करून अधिकात अधिक फायदा करून घेण्याची कारभारविषयक कुशलता नाही. त्याच-प्रमाणे शेतीच्या विकासासाठी करावयाच्या कामाचे पोर्वापर्यही नीट ठरविण्यात आलेले नाही. परिणामी अधिक जरूरीच्या खताच्या कारखान्यांपेक्षा मोठ्या धरण योजनांवर अधिक जोर देण्यात आला.

**सुवर्णरोख्यांना तितकासा प्रतिसाद नाही**—चालू महिन्या-च्या ४ तारखेपर्यंत राष्ट्रीय संरक्षण सुवर्णरोख्यांच्या योजनेच्या पोटी ५१९ किलोग्रॅम सोने जमा झाले होते. सोन्याच्या बाजारा-तील किमतीप्रमाणे ते ६० लाख रुपयांचे होते. ह्या पूर्वी काढ-ण्यात आलेल्या दोन सुवर्णरोख्यांच्या योजनेत ११·९ कोटी रुपयांचे सोने जमा झाले होते. चालू योजनेत १९८० अखेर सोनेच परत देण्याची सोय असूनही त्यामानाने सोने जमले नाही. योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला नाही तर जबर करवाढ करावी लागेल असा इषारा पंतप्रधान शास्त्री ह्यांनी दिला आहे.

**हिशेब तपासनिसांची परिषद**—नोव्हेंबर महिन्याच्या अखेर दिल्ली येथे आशिआतील पॅसिफिक भागातील अकौंटंट्सची व ऑडिटर्सची ४ थी परिषद भरणार आहे. ह्या परिषदेत १,००० हिंदी अकौंटंट्स् प्रतिनिधी म्हणून भाग घेणार आहेत. त्याशिवाय ह्या क्षेत्रांतील १०० परदेशीय तज्ज्ञही दिल्लीला येणार आहेत. ह्या व्यवसायात अलीकडे विजेचे कॉम्प्युटर्स वापरण्यास प्रारंभ झाल्याने नवे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

**विमानांची हानी भरून काढली**—भारत व पाकिस्तान ह्यांच्यांत झालेल्या अघोषित युद्धात झालेली भारताच्या विमानांची हानी भरून काढण्यात आली आहे. ह्या संघर्षात भारताची वैमानिक हानी पाकिस्तानच्या निम्याने होती अशी माहिती भारताच्या विमानदलाचे प्रमुख अर्जुनसिंग ह्यांनी सांगितली. मोडतोड झालेली विमानेही दुरुस्त करण्यासारखी होती असेही त्यांनी सांगितले.

**शांतता निरीक्षकांचा खर्च**—भारत व पाकिस्तान ह्यांच्या-मधील युद्धबंदी रेषेवर संयुक्त राष्ट्रसंघटनेचे लष्करी निरीक्षक देखरेख करीत आहेत. ह्या निरीक्षकांचा तीन महिन्यांचा खर्च १६ लाख, ४५ हजार डॉलर्स अथवा ८० लाख रुपये होईल. लष्करी निरीक्षकांच्या संख्येत वाढ करण्याचे ठरल्यास त्यासाठी वर्षाला २० लाख डॉलर्स अथवा १ कोटी रुपये खर्च येईल भारतावर आक्रमण झालेले असल्यामुळे हा खर्च सोसण्याची त्याची तयारी नाही.

**दिल्लीत नवे होटेल**—दिल्ली येथे सार्वजनिक मालकीच्या विभागात एक नवे होटेल स्थापन करण्यात आले आहे. होटेल-मध्ये २४० एका गाळ्याच्या व २४ दोन गाळ्याच्या जागा आहेत. बांधकाम आणि घरबांधणी खात्यातर्फे चालविण्यात येणारे हे ४ थे जनपद होटेल आहे. सर्व होटेलांत मिळून ७७० पाहुण्यांची सोय होऊ शकते. होटेलची इमारत अनेक मजले उंच आहे.


new ATTRACTIVE rates of interest on deposits

| SAVINGS DEPOSITS | FIXED DEPOSITS | RECURRING DEPOSITS |
| --- | --- | --- |
| 4 % | Maximum 7 5/8 % according to period | upto 6 % Period 24, 30, 36 months. + An Attractive Gift of a Ball Pen |

THE BANK OF MAHARASHTRA LTD.
1177, Budhwar Peth, Poona 2
6520


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात त्या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.